**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
Rajeev Gandhi Bhavan,Sharanpur Road, (Post Box no.१२),
Nashik-४२२ ००२.
Visit us at : www.nmc.gov.in E-mail: dmc_lic@nmc.gov.in Ph.no. ०२५३-२२२२४७६

जा. क्र. जापवि/कक्ष-१/२०३ /२०२१.
दिनांक :२० / ०६ /२०२१
NMC/DTD/OWL/२०२१/

परिपत्रक

विषय :- सार्वजनिक गणेशोत्सव २०२१ मार्गदर्शक सूचना.
संदर्भ :- १) मा. उपसचिव , गृह विभाग, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. आरएलपी-०६२१/ प्र. क्र. १४४/ विशा १ब , मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक २९ जून, २०२१.
२) सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी सार्वजनिक ठिकाणी तात्पुरता मंडप / स्टेज, कमान उभारण्यास ऑनलाईन परवानगी देणेबाबत सुधारित परिपत्रक-
नाशिक मनपा जा. क्र. जापवि/कक्ष-१/४३२/२०२० दिनांक ०७/०७/२०२०.

उपरोक्त् विषयांकीत संदर्भ क्र. १ अन्वये, कोविड -१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता यावर्षीचा गणेशोत्सव साध्या पध्दतीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी सार्वजनिक ठिकाणी तात्पुरता मंडप / स्टेज, कमान उभारण्यास ऑनलाईन परवानगी देणेबाबत संदर्भ क्र.२ सुधारित परिपत्रक प्रसिध्द केलेले आहेत.

संदर्भ क्र. १ अनुषंगाने, सार्वजनिक गणेशोत्सव २०२१ करीता नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सार्वजनिक मंडळे / नागरिक तसेच सर्व संबंधित यांना खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| १. | सार्वजनिक गणेशोत्सवासाठी गणेशोत्सव मंडळांनी महापालिका / स्थानिक प्रशासन यांची त्यांचे धोरणानुसार यथोचित पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. |
| २. | कोविड -१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता महापालिका तसेच संबंधित स्थानिक प्रशासनाचे मंडपांबाबतचे धोरण यांचेशी सुसंगत असे मर्यादित स्वरुपाचे मंडप उभारण्यात यावेत. यावर्षीचा गणेशोत्सव साध्या पध्दतीने साजरा करणे अपेक्षित असल्याने घरगुती तसेच सार्वजनिक गणपतीची सजावट करतांना त्यात भपकेबाजी नसावी. |
| ३. | श्रीगणेशाची मुर्ती सार्वजनिक मंडळांकरिता ४ फूट व घरगुती गणपतीकरिता २ फूटांच्या मर्यादेत असावी. |
| ४. | या वर्षी शक्यतो पारंपारिक गणेशमुर्तीऐवजी घरातील धातू/संगमरवर आदी मुर्तीचे पूजन करावे. मुर्ती शाडूची / पर्यावरण पूरक असल्यास त्याचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे. विसर्जन घरी करणे शक्य नसल्यास नजिकच्या कृत्रिम विसर्जन स्थळी विसर्जन करण्यात यावे. |
| ५. | उत्सवाकरिता वर्गणी / देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्वीकार करावा. जाहिरातींच्या प्रदर्शनामुळे गर्दी आकर्षित होणार नाही असे पहावे. तसेच आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंती देण्यात यावी. |
| ६. | सांस्कृतिक कार्यक्रमांऐवजी आरोग्य विषयक उपक्रम / शिबीरे (उदा. रक्तदान) आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात यावी. |
| ७. | लागू करण्यात आलेले Level of Restrictions for Breaking the Chain बाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार इतर निर्बंध कायम राहतील. त्यामध्ये गणेशोत्सवानिमित्त कोणतीही शिथीलता देता येणार नाही. |
| ८. | आरती, भजन, किर्तन वा अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करतांना गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच ध्वनी प्रदुषणासंदर्भातील नियमांचे व तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. |
| ९. | श्रीगणेशाचे दर्शनाची सुविधा ऑनलाईन , केबल नेटवर्क, वेबसाईड व फेसबुक इत्यादींद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबत जास्तीत जास्त व्यवस्था करण्यात यावी. |

Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| १०. | गणपती मंडपांमध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच थर्मल स्क्रीनिंगची पर्याप्त व्यवस्था करण्याव यावी. प्रत्यक्ष येऊन दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी शरिरीक अंतराचे (फिजिकल डिस्टन्सींग) तसेच स्वच्छतेचे नियम ( मास्क, सॅनीटायझर इत्यादी ) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे. |
| ११. | श्रींच्या आगमन व विसर्जन मिरवणूका काढण्यात येऊ नयेत. विसर्जनाच्या पारंपारिक पध्दतीत विसर्जन स्थळी होणारी आरती घरीच करुन विसर्जन स्थळी कमीत कमी वेळ थांबावे. लहान मुले आणि वरीष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जनस्थळी जाणे टाळावे. संपूर्ण चाळींतील/इमारतीतील सर्व घरगुती गणेशमुर्तीच्या विसर्जनाची मिरवणूक एकत्रितरित्या काढण्यात येऊ नयेत. |
| १२. | महापालिका, विविध मंडळे गृहनिर्माण संस्था, लोक प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था इत्यादींच्या मदतीने गणेशमुर्तीच्या विसर्जनाकरिता कृत्रीम तलावांची निर्मिती करण्यात यावी. |
| १३. | कोविड-१९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महापालिका , पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे. |

सदरचे परिपत्रक मनपा वेबसाईड www.nmc.gov.in वर नागरिकांचे माहितीसाठी प्रसिध्द आहेत.

(कैलास जाधव)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका,नाशिक

प्रत : माहितीस्तव सादर-
१) मा.खासदार / मा.आमदार, नाशिक.
२) मा. विभागीय आयुक्त, नाशिक.
३) मा. महापौर, महानगरपालिका , नाशिक.
४) सर्व सन्मानिय पदाधिकारी / नगरसेवक / नगरसेविका, महानगरपलिका, नाशिक.

प्रत : माहिती व आवश्यक ती कार्यवाहीसाठी-
१) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक.
२) मा. पोलीस आयुक्त तथा अपर जिल्हादंडाधिकारी, नाशिक शहर.
३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक.
४) सर्व सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळे / नागरिक / संस्था इ.

प्रत : कार्यवाहीस्तव-
१) अतिरिक्त आयुक्त (शहर / सेवा ), महानगरपालिका, नाशिक.
२) सर्व विभागप्रमुख, महानगरपालिका, नाशिक.
३) सर्व विभागीय अधिकारी, महानगरपालिका, नाशिक.
४) जनसंपर्क अधिकारी, महानगरपालिका, नाशिक यांनी सर्व स्थानिक वर्तमान पत्रातून सदर परिपत्रकास व्यापक प्रसिध्दी दयावी.

Scanned by CamScanner